Pudhari, 29/05/2025

# भात, उडदासह १३ पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ

## केंद्राचा शेतकऱ्यांना दिलासा; उत्पन्न वाढणार

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

**२०२५-२६ च्या खरीप पणन हंगामासाठी भातासह १३ प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनांना चांगला भाव मिळण्यास आणि त्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल. यासाठी केंद्र सरकार सुमारे दोन लाख सात हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.**



बैठकीनंतर केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत पत्रकारांना माहिती दिली. ते म्हणाले, सामान्य प्रकारच्या भाताची किमान आधारभूत किंमत आता प्रतिक्विंटल २,३६९ रुपये असेल. यामध्ये ६९ रुपयांची वाढ झाली आहे. ग्रेड-ए भाताची किमान आधारभूत किंमत २,३८९ रुपये प्रतिक्विंटल निश्चित करण्यात आली आहे.

याशिवाय, इतर खरीप पिकांच्या किमान आधारभूत किमतीतही वाढ करण्यात आली आहे. नाचणीच्या किमान आधारभूत किमतीत ५९६ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. कापसाच्या किमतीत ५८९ रुपये आणि तिळाच्या किमतीत ५७९ रुपयांची वाढ झाली आहे. त्याच वेळी, तूरडाळीच्या किमान आधारभूत किमतीत ४५० रुपये आणि उडदाच्या किमतीत ४०० रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. या वाढीमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांना चांगला भाव मिळेल आणि त्यांचे उत्पन्न वाढेल, असे वैष्णव म्हणाले.

### कशी असेल वाढ?

सामान्य प्रकारच्या भाताच्या दरात क्विंटलमागे ६९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. कापूस ५८९ रुपये, नाचणी ५९६ रुपये, तूरडाळ ४५० रुपये, उडीद ४०० रुपये वाढ झाली आहे. नायजर बियाण्याच्या (काळे तीळ) आधारभूत किमतीत सर्वाधिक ८२० रुपये वाढ करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

### कापसाच्या किमान आधारभूत किमतीतही वाढ

कापसाच्या किमान आधारभूत किमतीतही लक्षणीय ५८९ रुपयांची वाढ करण्यात आली. यामुळे मध्यम आकाराच्या कापसाची आधारभूत किंमत ४,०१० रुपये प्रतिक्विंटल होईल. लांब फायबर कापसाची किंमत प्रतिक्विंटल ४,११० रुपये असेल, असे सांगून पान २ वर ▶

Pudhari, 29/05/2025

# भात, उडदासह १३ पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ

**(पान १ वरुन)** वैष्णव म्हणाले, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, त्यांना खचपिक्षा चांगले उत्पन्न मिळावे आणि पीक विविधतेला प्रोत्साहन देणे हा या आधारभूत किमतीत वाढ करण्यामागे उद्देश आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. एमएसपीमध्ये झालेली ही वाढ त्याच दिशेने आणखी एक पाऊल आहे. शेतकरी हे अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. त्यांना सक्षम बनवणे हे सरकारचे प्राधान्य आहे.

| | पिके | नवी एमएमपी | जुनी एमएमपी | एकूण वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | भात (सामान्य) | २,३६९ | २,३०० | ६९ |
| | भात (ग्रेड ए) | २,३८९ | २,३२० | ६९ |
| २ | ज्वारी (हायब्रीड) | ३,६९९ | ३,३७१ | ३२८ |
| | ज्वारी (मालदांडी) | ३,७४९ | ३,४२१ | ३२८ |
| ३ | बाजरी | २,७७५ | २,६२५ | १५० |
| ४ | रागी | ४,८८६ | ४,२९० | ५९६ |
| ५ | मका | २,४०० | २,२२५ | १७५ |
| ६ | तूरडाळ | ८,००० | ७,५५० | ४५० |
| ७ | मूग | ८,७६८ | ८,६८२ | ८६ |
| ८ | उडीद | ७,८०० | ७,४०० | ४०० |
| ९ | शेंगदाणे | ७,२६३ | ६,७८३ | ४८० |
| १० | सूर्यफूल | ७,७२१ | ७,२८० | ४४१ |
| ११ | सोयाबीन | ५,३२८ | ४,८९२ | ४३६ |
| १२ | तीळ | ९,८४६ | ९,२६७ | ५७९ |
| १३ | पांढरा तीळ | ९,५३७ | ८,७१७ | ८२० |
| १४ | कापूस | ७,७१० | ७,१२१ | ५८९ |

## शेतकऱ्यांसाठी सुधारित व्याज अनुदान योजना कायम

केंद्रीय मंत्रिमंडळाने व्याज अनुदान योजनेलाही मान्यता दिल्याची माहिती अश्विनी वैष्णव यांनी दिली. यांतर्गत, शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून स्वस्त दरात अल्पकालीन कर्ज मिळते, असे सांगून वैष्णव म्हणाले, आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी १.५ टक्के व्याज अनुदानासह सुधारित व्याज अनुदान योजना सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही योजना सुरू ठेवल्यास सरकारी तिजोरीवर १५,६४० कोटी रुपयांचा भार पडेल.

'एमआयएसएस'अंतर्गत, शेतकऱ्यांना 'केसीसी'द्वारे ७ टक्के सवलतीच्या व्याज दराने ३ लाख रुपयांपर्यंतचे अल्पकालीन कर्ज मिळते, ज्यावर पात्र कर्ज देणाऱ्या संस्थांकडून १.५ टक्के व्याज अनुदान दिले जाते. याव्यतिरिक्त, जे शेतकरी वेळेवर कर्ज फेडतात त्यांना त्वरित परतफेड प्रोत्साहन म्हणून ३ टक्क्यांपर्यंत प्रोत्साहन मिळण्यास पात्र आहेत, ज्यामुळे व्याज दर ४ टक्क्यांपर्यंत कमी होतो.

सकाळ अॅग्रोवन ६
शनिवार, २४ मे २०२५

# चांदूर बाजार समितीने युक्तीने गाठला कोटीच्या उत्पन्नाचा टप्पा

## खेडा खरेदीवर नियंत्रणासाठी राबविली बक्षीस योजना

अॅग्रोवन वृत्तसेवा

अमरावती : खेडा खरेदीच्या माध्यमातून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या लुटीवर नियंत्रण मिळविण्याबरोबरच त्यांना बाजारपेठेचा श्वाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्याकरिता चांदूर बाजार बाजार समितीने 'लकी ड्रॉ'ची अभिनव संकल्पना मांडली. या युक्तीतून बाजार समितीने गेल्या ५० वर्षांत पहिल्यांदा एक कोटी २० लाख रुपयांच्या उत्पन्नाचा टप्पा गाठला.

मेळघाटातील आदिवासींसाठी शेतीमाल विक्रीचा अचलपूर बाजार समिती ही पर्याय होती. याच बाजार समितीअंतर्गत ५० वर्षांपूर्वी चांदूर बाजार समितीचा देखील समावेश होता. परंतु दोन तालुक्यांचा कारभार आणि कार्यक्षेत्राचा वाढता विस्तार, त्यातून शेतकऱ्यांची होणारी ओढाताण यामुळे प्रशासकीय स्तरावर अचलपूर बाजार समितीच्या विभाजनाचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर सुमारे ५० वर्षांपूर्वी स्वतंत्र चांदूर बाजार बाजार समिती अस्तित्वात आली. सध्या ही बाजार समिती सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरी करीत आहे. या बाजार समितीच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत संत्रा फळपीक होते. या पिकातून बाजार समितीला वर्षाकाठी सव्वातीन कोटी रुपये मिळत. परंतु सरकारने फळपिके नियमनमुक्त केली आणि बाजार समितीच्या उत्पन्नावर त्याचा मोठा परिणाम झाला. भुसार मालाची खेडा खरेदी होत असल्याने त्याचाही परिणाम उत्पन्नावर दिसून येत होता. यावर उपाय म्हणून बाजार समिती सभापती सतीश मोहोड व संचालक मंडळाच्या कल्पकतेतून बक्षीस योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. या अंतर्गत बाजारात विक्रीसाठी कमीत कमी पाच क्विंटल धान्य आणणाऱ्या शेतकऱ्यांना कुपन देण्यात आले. त्याच्या सोडतीत ट्रॅक्टर, होंडा शाईन, तुषार सिंचन संच, आटा चक्की, ताडपत्री, पॉवर स्प्रे अशी १११ बक्षिसे ठेवली आहेत. दहा लाखांची बक्षिसे दिली जाणार अलून शनिवारी (ता. २४) सकाळी दहा वाजता सोडत काढत बक्षीस वितरण केले जाईल. यातून बाजार समितीच्या उत्पन्नातही वाढ होत ते ६० लाखांवरून १ कोटी २० लाखांवर पोहोचले.



"सुरक्षेसाठी सीसीटीव्ही, शिवभोजन, धान्य प्रतवारीकरिता ग्रेडिंग मशिन अशा सुविधा आहेत. मका लिलावासाठी खुले बाजार ओटे, भाजीपाला शेड, विजेवरील खर्च कमी करण्यासाठी सौर यंत्रणा बसविण्याचे प्रस्तावित आहे. या सर्व उपक्रमांमुळे पणन मंडळाच्या उत्पन्नशील बाजार समित्यांच्या क्रमवारीत महाराष्ट्रात पाचवा, अमरावती जिल्ह्यात पहिला तर विभागातून दुसरा क्रमांक चांदूर बाजारने पटकाविला आहे.

**- सतीश मोहोड, सभापती, बाजार समिती चांदूर बाजार, अमरावती**

Janpravas, 14/05/2025

# सांगलीतील आंबा महोत्सवात ३४ लाखांची उलाढाल

## ■ सुजय शिंदे : ग्राहकांचा प्रतिसाद

**जनप्रवास । सांगली**

राज्य कृषि पणन मंडळ, कोल्हापूर व कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या सांगली आंबा महोत्सवाचा सोमवारी समारोप झाला. पाच दिवस चाललेल्या महोत्सवात तब्बल ३३.६० लाख रुपयांची उलाढाल झाल्याचे सभापती सुजय शिंदे व पणनचे कोल्हापूर विभाग उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी सांगितले.

पणनमंत्री जयकुमार रावल व कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनामुळे सांगली आंबा महोत्सवास प्रतिसाद मिळाला. सांगलीतील महोत्सवात सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली, सोलापूर जिल्ह्यातील १८ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. सहभागी सर्वच आंबा उत्पादकांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. रत्नागिरी जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादकांनी यावर्षी क्यूआर कोडचा वापर केल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला. या पाच दिवस चाललेल्या आंबा महोत्सवात ३३.६० लाखाचे उलाढाल झाली. या आंबा महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे सांगली जिल्ह्यात उत्पादित झालेल्या आंब्याच्या विविध ३६ जातींचे प्रदर्शन मांडण्यात आलेले होते. त्यामुळे ग्राहकांना आंब्याच्या विविध जाती पहायला मिळाल्या.

आंबा उत्पादक डॉ. केशव सरगर यांनी कृषी पणन मंडळाचे आभार मानत पणन मंडळामुळे आम्ही थेट आंब्याची विक्री करायला शिकलो, असे नमूद केले. दापोली येथील आंबा उत्पादक सलमान मुकादम यांनी यावर्षी सांगलीकरांनी प्रचंड प्रतिसाद दिल्याचे सांगितले. रत्नागिरी येथील आंबा उत्पादक जोशी यांनी सांगलीमध्ये रत्नागिरी हापूस आंब्याचे उत्तम विक्री झाल्याचे नमूद केले. पणनचे अधिकारी ओंकार माने यांनी आंबा उत्पादकांचे आभार मानले.

ांगली पुण्य नगरी

सांगली । मंगळवार, १३ मे २०२५

# आंबा महोत्सवात ३४ लाखांची उलाढाल

## सांगलीकरांचा प्रतिसाद : १८ उत्पादक, शेतकऱ्यांचा सहभाग

**सांगली / प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, कोल्हापूर व कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सांगली आंबा महोत्सवाला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. या महोत्सवात ३३ लाख ६० हजार रुपयांची उलाढाल झाली, अशी माहिती कोल्हापूर विभागाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी दिली.

राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल व कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम व सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या आंबा महोत्सवात सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली, सोलापूर जिल्ह्यातील १८ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. या आंबा महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे सांगली जिल्ह्यात उत्पादित झालेल्या आंब्याच्या विविध ३६ जातींचे प्रदर्शन मांडण्यात आलेले होते. त्यामुळे ग्राहकांना आंब्याच्या विविध जाती पहायला मिळाल्या. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादकांनी यावर्षी क्यूआर कोडचा वापर केल्याने ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला. रत्नागिरीचा प्युअर हापूस आंबा उपलब्ध झाल्याचा आनंद मिळाला. पाच दिवस चाललेल्या आंबा महोत्सवामध्ये ३३.६० लाखाची उलाढाल झाली.

महोत्सवात सहभागी झालेल्या आंबा उत्पादकांना आयोजकांकडून प्रशस्तीपत्र देण्यात आले. माळशिरस तालुक्यातील आंबा उत्पादक डॉ. केशव सरगर यांनी कृषी पणन मंडळाचे आभार मानले. पणन मंडळामुळे आम्ही थेट आंब्याची विक्री करायला शिकलो असे नमूद केले. दापोली येथील आंबा उत्पादक सलमान मुकादम यांनी सांगलीकरांनी प्रचंड प्रतिसाद दिल्याचे सांगितले. रत्नागिरी येथील आंबा उत्पादक जोशी यांनी सांगलीत रत्नागिरी हापूस आंब्याची उत्तम विक्री झाल्याचे नमूद केले. पणनचे अधिकारी ओंकार माने यांनी आभार मानले.



**सांगली : येथे आंबा महोत्सवात आंबा खरेदी करताना ग्राहक. (छाया : धामणीकर)**

Pudhari, 13/05/2025

# आंबा महोत्सवात ३३ लाखांची उलाढाल

## सांगली, सोलापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी येथील आंबा उत्पादकांचा सहभाग

प्रतिनिधी
सांगली

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, कोल्हापूर व कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या सांगली आंबा महोत्सव २०२५ मध्ये पाच दिवसात ३३ लाख ६० हजाराची उलाढाल झाली.

महोत्सवात सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली, सोलापूर जिल्ह्यातील १८ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सहभाग घेतलेला होता. या आंबा महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे सांगली जिल्ह्यात उत्पादित झालेल्या आंब्याच्या विविध ३६ जातींचे प्रदर्शन मांडण्यात आलेले होते. त्यामुळे ग्राहकांना आंब्याच्या विविध जाती पाहायला मिळाल्या.

तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादकांनी यावर्षी क्यू आर कोडचा वापर



केल्याने ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला. कोल्हापूर विभागाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी सांगितले. राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल व कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनामुळे सांगली आंबा महोत्सवास प्रचंड प्रतिसाद मिळाल्याचे डॉक्टर घुले यांनी सांगितले.

सहभागी झालेल्या सर्वच आंबा उत्पादकांना आयोजकांकडून प्रशस्तीपत्रे देण्यात आली. यावेळी बोलताना माळशिरस तालुक्यातील आंबा उत्पादक डॉ. केशव सरगर यांनी कृषी पणन मंडळाचे आभार मानले.

दापोली येथील आंबा उत्पादक सलमान मुकादम यांनी यावर्षी सांगलीकरांनी प्रचंड प्रतिसाद दिल्याचे सांगितले. रत्नागिरी येथील आंबा उत्पादक सौ. जोशी यांनी सांगलीमध्ये रत्नागिरी हापूस आंब्याचे उत्तम विक्री झाल्याचे नमूद केले. पणनचे अधिकारी ओंकार माने यांनी उपस्थित आंबा उत्पादकांचे आभार मानले.



Lokmat, 13/05/2025

# आंबा महोत्सवात ३३ लाखांची उलाढाल

सांगली, ता. १२ : राज्य कृषी पणन मंडळ, कोल्हापूर व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विद्यमाने आयोजित केलेल्या सांगली आंबा महोत्सवाला चांगला प्रतिसाद मिळाला. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली, सोलापूर जिल्ह्यांतील १८ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. पाच दिवस चाललेल्या आंबा महोत्सवामध्ये ३३.६० लाख रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती कोल्हापूर विभागाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी दिली.



जिल्ह्यात उत्पादित झालेल्या आंब्याच्या विविध ३६ जातींचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. त्यामुळे ग्राहकांना आंब्याच्या विविध जाती पाहायला मिळाल्या. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादकांनी यंदा 'क्यूआर कोड'चा वापर केल्याने ग्राहकांना अस्सल आंबा मिळाला.

पणन मंत्री जयकुमार रावल व कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाने महोत्सवास प्रतिसाद मिळाला.

सहभागी आंबा उत्पादकांना प्रशस्तिपत्र देण्यात आले. माळशिरस तालुक्यातील आंबा उत्पादक डॉ. केशव सरगर यांनी पणन मंडळामुळे थेट आंब्याची विक्री करायला शिकल्याचे नमूद केले. दापोली येथील आंबा उत्पादक सलमान मुकादम, रत्नागिरी येथील सौ. जोशी यांनी हापूस आंब्याची उत्तम विक्री झाल्याचे सांगितले. ओंकार माने यांनी आभार मानले.

Lalkar, 13/05/2025

# सांगली आंबा महोत्सवास प्रचंड प्रतिसाद

## ३३.६० लाखाची उलाढाल

। ललकार वृत्त ।

सांगली दि. १२ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, कोल्हापूर व कृषि उत्पन्न बाजार समिती, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सांगली आंबा महोत्सव २०२५ ला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळून ३३ लाख ६० हजार रुपयांची उलाढाल झाली. ही माहिती कोल्हापूर विभागाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे, राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल व कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम व सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या आंबा महोत्सवात सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली, सोलापूर जिल्ह्यातील १८ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. या आंबा महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे सांगली जिल्ह्यात उत्पादित झालेल्या आंब्याच्या विविध ३६ जातींचे प्रदर्शन मांडण्यात आलेले होते. त्यामुळे ग्राहकांना आंब्याच्या विविध जाती पाहायला मिळाल्या. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादकांनी यावर्षी क्यू आर कोड चा वापर केल्याने ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला. तसेच आपणास रत्नागिरीचा प्युअर हापूस आंबा उपलब्ध झाल्याचा आनंद मिळाला. या पाच दिवस चाललेल्या आंबा महोत्सवामध्ये एकूण रक्कम रुपये ३३.६० लाखाचे उलाढाल झाल्याचे पत्रकात म्हटले आहे.

सहभागी झालेल्या सर्वच आंबा उत्पादकांना आयोजकांकडून प्रशस्तीपत्र देण्यात आले. यावेळी माळशिरस तालुक्यातील आंबा उत्पादक डॉ. केशव सरगर यांनी कृषि पणन मंडळाचे आभार मानले व पणन मंडळामुळे आम्ही थेट आंब्याची विक्री करायला शिकलो असे नमूद केले. दापोली येथील आंबा उत्पादक सलमान मुकादम यांनी यावर्षी सांगलीकरांनी प्रचंड प्रतिसाद दिल्याचे सांगितले. रत्नागिरी येथील आंबा उत्पादक सौ. जोशी यांनी सांगलीमध्ये रत्नागिरी हापूस आंब्याचे उत्तम विक्री झाल्याचे नमूद केले. पणनचे अधिकारी ओंकार माने यांनी उपस्थित आंबा उत्पादकांचे आभार मानले.

Kesari, 13/05/2025

# सांगलीच्या आंबा महोत्सवात ३४ लाखांची उलाढाल

## ३६ प्रकारचे आंबे, १८ हून अधिक उत्पादकांचा सहभाग

**केसरी वृत्तसेवा**

**सांगली :** राज्य कृषी पणन मंडळ, कोल्हापूर व कृषी उत्पन्न बाजार समिती, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या सांगली आंबा महोत्सवाचा सोमवारी समारोप झाला. पाच दिवस चाललेल्या महोत्सवात तब्बल ३३.६० लाख रुपयांची उलाढाल झाल्याचे सभापती सुजय शिंदे व पणनचे कोल्हापूर विभाग उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी सांगितले.

राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल व कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांच्या मार्गदर्शनामुळे सांगली आंबा महोत्सवास प्रतिसाद मिळाला. सांगलीतील महोत्सवात सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सांगली, सोलापूर जिल्ह्यातील १८ आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. सहभागी सर्वच आंबा उत्पादकांना प्रशस्तिपत्र देण्यात आले. रत्नागिरी जिल्ह्यातील हापूस आंबा उत्पादकांनी यावर्षी क्यूआर कोडचा वापर केल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला. या पाच दिवस चाललेल्या आंबा महोत्सवात ३३.६० लाखांची उलाढाल झाली.

या आंबा महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे सांगली जिल्ह्यात उत्पादित झालेल्या आंब्यांच्या विविध ३६ जातींचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. त्यामुळे ग्राहकांना आंब्याच्या विविध जाती पाहायला मिळाल्या.

यावेळी माळशिरस तालुक्यातील आंबा उत्पादक डॉ. केशव सरगर यांनी कृषी पणन मंडळाचे आभार मानत पणन मंडळामुळे आम्ही थेट आंब्याची विक्री करायला शिकलो, असे नमूद केले. दापोली येथील आंबा उत्पादक सलमान मुकादम यांनी यावर्षी सांगलीकरांनी प्रचंड प्रतिसाद दिल्याचे सांगितले. रत्नागिरी येथील आंबा उत्पादक जोशी यांनी सांगलीमध्ये रत्नागिरी हापूस आंब्याची उत्तम विक्री झाल्याचे नमूद केले. पणनचे अधिकारी ओंकार माने यांनी आंबा उत्पादकांचे आभार मानले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# 'एनआयपीएचटी'ला केंद्रीय संस्थेशी जोडून प्रशिक्षण क्षमता वाढविणार

## पणनमंत्री जयकुमार रावल यांची माहिती; निधीची जादा उपलब्धताही करणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्य कृषी पणन मंडळाच्या पुढाकाराने चालविण्यात येत असलेल्या तळेगाव दाभाडे (ता. मावळ, जि. पुणे) येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेला (एनआयपीएचटी) केंद्र सरकारच्या संस्थांबरोबर जोडून प्रशिक्षणाचे काम अधिक क्षमतेने चालविण्यासाठी पावले उचलण्यात येत असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.**

पणन मंडळात शुक्रवारी (दि.९) झालेल्या पणन संचालनालयाच्या आढावा बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, एनआयपीएचटी ही संस्था सध्या आर्थिक अडचणीत आहे. एनआयपीएचटीच्या अधिकारी- कर्मचाऱ्यांनी काम करून प्रशिक्षणे वाढविली पाहिजेत. ज्याद्वारे ही संस्था स्वावलंबी करण्यास सर्वांचे योगदान अपेक्षित आहे. तसेच, केंद्र सरकारच्या संस्थेशी जोडून ती चालविण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. तसा प्रस्तावही आम्ही दिल्याचे नमूद करुन ते म्हणाले, एनआयपीएचटी संस्थेत लवकरच प्रथम टप्प्यामध्ये पणन संचालनालयातील अधिकारी- कर्मचाऱ्यांना निर्यात व अनुषंगिक विषयांवर प्रशिक्षण देणार आहोत. केंद्र सरकारमार्फत ही संस्था प्रशिक्षणासाठी घेतली तर पुण्यानजिक असलेल्या या संस्थेत सर्वांनाच प्रशिक्षण देता येईल.

### 'एनआयपीएचटी'च्या संचालकपदी मिलिंद आकरे



राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेमध्ये संचालक हे पद रिक्त आहे. ही संस्था सुगीपश्चात तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी महत्वाची आहे. त्यामुळे नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ पोस्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी तथा 'एनआयपीएचटी'च्या संचालक पदी सहकार आयुक्तालयातील अपर निबंधक मिलिंद आकरे यांची नियुक्ती केली आहे. शासनाचा पुढील आदेश होईपर्यंत त्यांच्याकडे संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्याचे आदेश सहकार विभागाचे उपसचिव नितीन गायकवाड यांनी जारी केले आहेत. आकरे यांनी यापूर्वी राज्य कृषी पणन मंडळात सरव्यवस्थापक, कार्यकारी संचालक पदाचा पदभार सांभाळला असल्याने त्यांना 'एनआयपीएचटी'च्या कामाची संपूर्ण माहिती आहे. त्याचा फायदा या संस्थेच्या कामास गती मिळण्यासाठी होण्याची अपेक्षा आहे. तसेच, त्यांनी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे (एमसीडीसी) व्यवस्थापकीय संचालक पदही भूषविले आहे.

### एनआयपीएचटीला नेदरलॅण्डचे शिष्टमंडळ जूनमध्ये येणार

एनआयपीएचटी या संस्थेच्या प्रशिक्षण गुणवत्तेत वाढ करून त्यांना निधी उपलब्धताही करण्यास आम्ही प्राधान्य दिले आहे. तसेच, प्रशिक्षणासंदर्भात नेदरलॅण्ड येथील वेगेनिंगेन विद्यापीठाबरोबर आमचा एक करारही झाला आहे. तसेच, नेदरलॅण्डचे शिष्टमंडळ जून महिन्यात या ठिकाणी भेट देणार आहे. तेथे शेतकरी, शेतकऱ्यांची जी मुले उद्योजक बनू पाहत आहेत, त्यांना प्रशिक्षण देणार आहोत. राहणे आणि खाण्याची व्यवस्थाही केली जात आहे.

# राज्यात काजू प्रक्रिया व्यवस्था बळकट करा : पणनमंत्री रावल

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : राज्यात आणि देशात काजूची मागणी मोठ्या प्रमाणावर आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात काजूची उत्पादकता वाढविण्याची संधी असून, आवश्यक त्या उपाययोजना करून उत्पादकता वाढविता येईल. त्यासाठी काजू पिकाचे उत्पादन घेताना तसेच उत्पादनानंतर त्यावर होणाऱ्या प्रक्रियेसंदर्भात येणाऱ्या अडचणींवर अभ्यासपूर्ण उपाययोजना कराव्यात. राज्यातील काजू उत्पादकता व प्रक्रिया व्यवस्था सक्षम करण्यासाठी जगातील प्रमुख देशांतील अद्ययावत प्रक्रिया तंत्रज्ञानाचा अभ्यास करून ते आपल्याकडे राबविण्या संदर्भात उपाययोजना कराव्यात, असे निर्देश राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य काजू मंडळाची येथे गुरुवारी (ता. ८) बैठक झाली. त्या वेळी मंत्री रावल बोलत होते. या वेळी महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशनचे कार्यकारी संचालक श्रीधर डुबे पाटील, महाराष्ट्र राज्य पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, पणन विभागाचे सहसचिव विजय लहाने तसेच काजू मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

मंत्री रावल म्हणाले, की काजू उत्पादनाच्या वाढीसाठी जगातील चांगल्या काजू वाणाचा अभ्यास करून राज्यात लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे. काजू पीक आल्यानंतर त्यावर प्रक्रिया व साठवणूक करण्याच्या कामासाठी महिला बचत गटाचा तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांचा सहभाग करून घ्यावा. त्यांनाही रोजगार निर्मिती होऊन, काजू प्रक्रिया जलद गतीने होण्यास मदत होईल. काजूतील ओलावा कमी करण्याच्या प्रक्रियेसाठी त्यांना गोदाम उपलब्ध करून देण्यासाठी उपाययोजना कराव्यात. चंदगड आणि कुडाळमध्ये काजू प्रक्रिया उद्योग उभारण्यासंदर्भात व्यवहार्यता तपासण्यात यावी. तसेच ५०० टन क्षमतेचे गोदाम उभारण्याबाबत नियोजन करावे.

काजू उत्पादन, त्यावरील प्रक्रिया, ग्रेडिंग, पॅकिंग, मार्केटिंग आणि मूल्यवर्धनासाठी जगातील अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करावा. काजू उद्योगांना अद्ययावत करण्यासाठी प्रयत्न करावा. काजू उद्योगांना अद्ययावत करण्यासाठी व्हिएतनाम, कंबोडिया यांसारख्या देशातील तसेच जगातील प्रगत तंत्रज्ञानाचा अभ्यास करून ते महाराष्ट्रात कसे राबवले जातील यासाठी काजू मंडळाने नियोजन करावे. १०० टन प्रति दिन उत्पादन क्षमतेचे प्रक्रिया उद्योग कसे उभारले जातील, या संदर्भात उपाययोजना कराव्यात. लागवडीपासून ते प्रक्रिया करून बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापराचे नियोजनपूर्वक काम केले तर काजू उत्पादन व उत्पन्न वाढू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या वेळी काजू मंडळाच्या विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली.



**पणन मंडळ, पुणे : महाराष्ट्र राज्य काजू मंडळाची गुरुवारी (ता. ८) बैठक झाली. त्या वेळी पणनमंत्री जयकुमार रावल, महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशनचे कार्यकारी संचालक श्रीधर डुबे पाटील, राज्य पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे आदी उपस्थित होते.**

तिसरा डोळा

सांगली, मंगळवार दि. 06 मे 2025

tisaradola.sangli@gmail.com

# वसंतदादा मार्केट यार्ड सांगली येथे "आंबा महोत्सव २०२५ " चे आयोजन...




सांगली (तिसरा डोळा वृत्तसंस्था) : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे, व सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने "सांगली आंबा महोत्सव २०२५" चे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक ८ मे ते १२ मे २०२५ अखेर वसंतदादा स्मृतिभवन, वसंत मार्केट यार्ड सांगली येथे आंबा महोत्सव असणार आहे. ८ मे रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ.सुभाष घुले यांनी दिली. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली श्री. मंगेश सुरवसे, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ कोल्हापूर उपसरव्यवस्थापक डॉ.सुभाष घुले, सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुजय (नाना) शिंदे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, श्री. विवेक कुंभार, जिल्हा परिषदचे कृषि विकास अधिकारी, श्री.मनोजकुमार वेताळ, बाजार समिती सांगलीचे उपसभापती श्री.रावसाहेब पाटील, पणन मंडळाचे पणन अधिकारी श्री. ओंकार माने, बाजार समिती सांगलीचे सचिव श्री.महेश चव्हाण, तसेच सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व संचालक मंडळ या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना १७ जानेवारी १९५१ रोजी पद्मभूषण वसंतदादा पाटील यांनी शेतकऱ्याच्या शेतीमालाला योग्य बाजारपेठ मिळावी, त्याच्या शेतीमालाला योग्य बाजार भाव मिळावा, त्याची आर्थिक सामाजिक प्रगती व्हावी या दृष्टिकोनातून स्थापना केली. सांगली बाजार समितीचे संस्थापक पद्मभूषण वसंतदादा पाटील यांच्या कर्तुत्वाने प्रेरणेने व आशीर्वादाने सांगली बाजार समितीच्या ७५ वर्षाच्या यशस्वी वाटचालीनंतर अमृत महोत्सवी वर्ष बाजार समितीस चालू आहे. आणि या अमृत महोत्सवी वर्षात शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवणे असा संकल्प, सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुजय नाना अशोकराव शिंदे उपसभापती रावसाहेब पाटील व सर्व संचालक मंडळांनी केला आहे. तसेच या आंबा महोत्सवाचे निमित्ताने शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतमालाची विक्री स्वतः उत्पादक शेतकरी करणार आहेत. उत्पादक शेतकरी स्टॉलचे माध्यमातून महापालिका स्तरावर शेतकर्यांचे आंबा फळे पिकास बाजारपेठ मिळणार आहे .उत्पादक ते ग्राहक यांच्यात या निमित्ताने थेट संवाद होणार आहे. उत्पादक शेतकरी ते ग्राहक या संकल्पनेतून सांगली नगरीतील नागरिकांना उत्तम दर्जाचा, अस्सल नैसर्गिक रित्या पिकविलेला हापूस व केशर आंबे उपलब्ध होणार आहेत. या आंबा महोत्सवाचे आयोजन सकाळी ६ ते रात्री ८ वाजेपर्यंत दररोज पाच दिवस केले आहे. तरी सांगली आंबा महोत्सवाचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन बाजार समिती सांगलीचे सभापती सुजय (नाना) शिंदे यांनी केले आहे.

Sakal, 09/05/2025

# सांगलीत उद्यापासून होणार आंबा प्रदर्शन

## वसंतदादा मार्केट यार्डात मिळणार नैसर्गिकरीत्या पिकलेला आंबा

■ सकाळ वृत्तसेवा





सांगली, ता. ६ : वसंतदादा मार्केट यार्डात ८ ते १२ मेदरम्यान आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य कृषी पणन मंडळ (पुणे), सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने 'आंबा महोत्सव २०२५'चे आयोजन केले आहे. वसंतदादा मार्केट यार्डात गुरुवारी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते हस्ते उद्घाटन आहे, अशी माहिती सभापती सुजय शिंदे यांनी आज दिली.

पद्मभूषण वसंतदादा पाटील यांनी शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळावी, शेतमालाला योग्य बाजार भाव मिळावा, आर्थिक सामाजिक प्रगती व्हावी, या दृष्टिकोनातून बाजार समितीची स्थापना केली. बाजार समितीचे अमृत महोत्सवी वर्ष सुरू आहे. शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रमांचा संकल्प, सभापती सुजय शिंदे, उपसभापती रावसाहेब पाटील, संचालकांनी केला आहे.

आंबा महोत्सवानिमित्त शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतमालाची विक्री स्वतः उत्पादक करणार आहेत. उत्पादक शेतकरी स्टॉलच्या माध्यमातून मनरपा स्तरावर शेतकऱ्यांची आंबा फळे पिकास बाजारपेठ मिळणार आहे. उत्पादक ते ग्राहक यांच्यात थेट संवाद होणार आहे. उत्पादक शेतकरी ते ग्राहक या संकल्पनेतून सांगलीतील नागरिकांना उत्तम दर्जाचा, अस्सल नैसर्गिकरीत्या पिकविलेला हापूस व केशर आंबा उपलब्ध होणार आहेत. आंबा महोत्सव सकाळी ९ ते रात्री ८ पर्यंत पाच दिवस आहे. नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. जिल्हा सहकार उपनिबंधक मंगेश सुरवसे, राज्य कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक सुभाष घुले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार, सचिव महेश चव्हाण उद्घाटनप्रसंगी उपस्थित राहणार आहेत.

Kesari, 09/05/2025

# शेतमाल विक्री व्यवस्था सक्षम करण्यासाठी जागतिक तंत्रज्ञानाचा वापर करा

**पुणे** : राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमाल विक्रीची व्यवस्था अधिक सक्षम करणे, हे पणन मंडळाचे प्रमुख कार्य आहे. राज्यात उत्पादन होणारी फळे, भाजीपाला यांचे ग्रेडिंग, पॅकिंग आणि मार्केटिंगसाठी जागतिक मार्केट व्यवस्थेशी सुसंगत उपाय करणे आवश्यक आहे. देशातंर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राच्या शेतमालाचे मार्केटींग वाढविण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळाला वर्तमान व्यवस्थेशी सांगड घालून वेगाने काम करावे लागेल. राज्यातील वर्तमान शेतमाल विक्री व्यवस्था असली तरी जगाच्या कृषी माल विक्री व्यवस्थेशी स्पर्धा करण्यासाठी जागतिक तंत्रज्ञानाचा वापर करू राज्यातील शेतमाल कृषी व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नियोजन करावे, असे निर्देश राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल



यांनी अधिकाऱ्यांनी दिले. राज्य कृषी उत्पन्न मंडळाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

गुरुवारी गुलटेकडी येथे राज्य कृषी पणन संचालक मंडळाची बैठक झाली. या बैठकीत विविध विषयांचा पणनमंत्र्यांनी आढावा घेतला. यावेळी कृषी आयुक्त सूरज मांढरे, सहकार आयुक्त दिपक तावरे, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, संचालक विकास रसाळ, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, व्यवस्थापक शैलेश जाधव, पणन मंडळाचे सदस्य नारायण पाटील, संचालक संजय पाटील, अन्य संचालक अधिकारी उपस्थित होते.

रावल म्हणाले, शेतकऱ्यांचा सेवेसाठी पणन मंडळ कार्यरत असून, त्यांच्या हिताच्या सुविधा पुरविण्यासाठी योजना तयार करा. त्यादृष्टीने व्यवस्था उभी करण्याचे काम पणन मंडळाचे आहे. शेतकरी उपयोगी सुविधा केंद्र असावीत अशा प्रकारे सुविधा केंद्राचे अद्ययावतीकरण करा, शेतकऱ्यांच्या मालाला मूल्यवर्धन करण्याची उपाय-योजना, नियोजन, पणन मंडळाने करावे. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला चांगला भाव मिळावा, अशी शासनाची भूमिका आहे. योजना किंवा सुविधांसाठी नागरिकांना ताटकळत ठेवण्याची मानसिकता बदलून अधिकाऱ्यांनी काम करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

बाजार समित्या मजबूत, सक्षम व आधुनिक सुविधांनी युक्त व्हाव्यात यासाठी पणन मंडळाने प्रयत्न करावेत. शेतकऱ्यांना राज्यातील कोणत्याही बाजार समितीतील खरेदी विक्रीचे दर कोणत्याही बाजार समितीत उपलब्ध होतील. अशी यंत्रणा इ-नामच्या माध्यमांतून राबविण्यात येत आहे. ती प्रक्रिया अधिक गतिमान व पारदर्शक करावी. केवळ औपचारिक प्रक्रिया न राबवता बाजार समित्यांचे आर्थिक स्वास्थ्य चांगले राहिल याची खबरदारी घेऊन विकास कामांना गती द्यावी, बाजार समित्यांमधील विकास कामे करताना स्टार्टअपला संधी द्यावी, ही कामे करताना दर्जेदार होतील याकडे लक्ष देण्याचे त्यांनी निर्देश दिले.

Sakal, 09/05/2025

# कृषी माल विक्रीसाठी तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक

## रावल : कृषी उत्पन्न मंडळाची आढावा बैठक



जयकुमार रावल

**पुणे, ता. ८ :** ''देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राच्या शेतमालाचे मार्केटिंग वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाला वर्तमान व्यवस्थेशी सांगड घालून वेगाने काम करावे लागेल. राज्यातील वर्तमान शेतमाल विक्री व्यवस्था व्यवस्थित असली; तरी जगाच्या कृषी माल विक्री व्यवस्थेशी स्पर्धा करण्यासाठी जागतिक तंत्रज्ञानाचा वापर करून राज्यातील शेतमाल कृषी व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नियोजन करावे,'' असे निर्देश पणनमंत्री जयकुमार रावल यांनी महाराष्ट्र कृषी पणन मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिले.

राज्य कृषी उत्पन्न मंडळाच्या गुरुवारी (ता. ८) झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी कृषी आयुक्त सूरज मांढरे, सहकार आयुक्त दीपक तावरे, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, संचालक विकास रसाळ, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, व्यवस्थापक शैलेश जाधव तसेच पणन मंडळाचे सदस्य नारायण पाटील, संचालक संजय पाटील आदी उपस्थित होते. रावल म्हणाले, ''महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सेवेसाठी पणन मंडळ कार्यरत असून त्यांच्या हिताच्या सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने योजना तयार करा. त्यादृष्टीने व्यवस्था उभी करण्याचे काम पणन मंडळाचे आहे. शेतकऱ्यांना राज्यातील कोणत्याही बाजार समितीतील खरेदी-विक्रीचे दर कुठल्याही बाजार समितीत उपलब्ध होतील, अशी यंत्रणा ई-नामच्या माध्यमातून राबवण्यात येत आहेत. ती प्रक्रिया गतिमान आणि पारदर्शक करावी, असेही ते म्हणाले.

Punyanagari, 09/05/2025

# आंब्याच्या दुर्मिळ जातीचे संवर्धन होणे आवश्यक

**जिल्हाधिकारी काकडे**
**आंबा महोत्सवास प्रारंभ**

**सांगली / प्रतिनिधी**

आंब्याच्या दुर्मिळ जातीचे संवर्धन होणे आवश्यक आहे असे मत जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे व सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वसंत मार्केट यार्ड येथील वसंतदादा स्मृती भवन येथे सांगली आंबा महोत्सव २०२५ चा प्रारंभ जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते झाला. यावेळी ते बोलत होते.

जिल्हाधिकारी काकडे यांनी प्रदर्शन हॉलची फित कापून व दीप प्रज्वलन करुन आंबा महोत्सवाचा शुभारंभ केला. त्यांनी विविध शेतकरी उत्पादक यांच्या स्टॉलला भेटी दिल्या. प्रदर्शनात मांडलेल्या विविध आंब्याच्या जातीविषयी माहिती जाणून घेतली. आंब्याच्या दुर्मिळ जातीचे संवर्धन झाले पाहिजे तसेच अशा प्रदर्शन, महोत्सवाच्या माध्यमातून उत्तम प्रतीचा आंबा सर्वसामान्य नागरिकांना उत्पादक शेतकरी ते ग्राहक यांच्या माध्यमातून मिळत असल्याबाबत जिल्हाधिकारी काकडे साहेब यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, सभापती सुजय शिंदे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार, कृषी विकास अधिकारी मनोजकुमार वेताळ, उपसभापती रावसाहेब पाटील, संचालक आनंदराव नलवडे, संग्राम पाटील, बापूसो बुरसे, महेश पवार, बाबासाहेब माळी, शशिकांत नागे, रमेश पाटील, रामचंद्र पाटील, प्रशांत मजलेकर, काडापा वारद, मारुती बंडगर, ओंकार माने सचिव महेश चव्हाण यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. आभार महेश चव्हाण यांनी मानले. प्रदर्शन दि. ८ ते १२ मे सकाळी ९ ते रात्री ८ पर्यंत सुरु असणार आहे.



**सांगली : जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी आंबा महोत्सवाला भेट दिली. याप्रसंगी सभापती सुजय शिंदे व मान्यवर.**

Pudhari, 09/05/2025

# आंबा महोत्सवात साडेतीन किलोचा आंबा

## जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्याहस्ते मार्केटयार्डात महोत्सवाला सुरूवात

प्रतिनिधी
सांगली

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे व सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मार्केटयार्ड येथील वसंतदादा स्मृतीभवन येथे सांगली आंबा महोत्सव २०२५ चा शुभारंभ जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते करण्यात आला. दरम्यान या आंबा महोत्सवात तब्बल साडेतीन किलोचा आंबा विक्रीस ठेवण्यात आला असून या महोत्सवाचे हे आकर्षण ठरले आहे.



सांगली : आंबा महोत्सवात साडेतीन किलोचा आंबा दाखवताना पदाधिकारी.

यावेळी राज्य कृषी व पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, बाजार समितीचे सभापती सुजय (नाना) शिंदे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विवेक कुंमार, कृषी विकास अधिकारी बाजार समितीचे उपसभापती रावसाहेब पाटील संचालक आनंदराव नलवडे, संग्राम दादा पाटील, बापूसो बुरसे, महेश पवार, बाबासाहेब माळी, शशिकांत नागे, रमेश पाटील, रामचंद्र पाटील, प्रशांत मजलेकर, काडापा वारद, मारुती बंडगर, ओंकार माने, पणन अधिकारी, सचिव महेश चव्हाण तसेच शेतकरी उत्पादक, कामगार, हमाल, बाजार समितीचे सर्व अधिकारी कर्मचारी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी काकडे यांनी विविध शेतकरी उत्पादक यांच्या स्टॉलला भेटी दिल्या प्रदर्शनात मांडलेल्या विविध आंब्याच्या जाती विषयी माहिती जाणून घेतली. आंब्याच्या दुर्मिळ जातीचे संवर्धन झाले पाहिजे तसेच अशा प्रदर्शन, महोत्सवाच्या माध्यमातून उत्तम प्रतीचा आंबा सर्वसामान्य नागरिकांना उत्पादक शेतकरी ते ग्राहक यांच्या माध्यमातून मिळत असल्याबाबत जिल्हाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले.

या आंबा महोत्सवामध्ये तब्बल साडेतीन किलोचे आंबा विक्रीस आणण्यात आला असून हा आंबा महोत्सवाचे आकर्षण ठरले आहे. याशिवाय महोत्सवामध्ये ३० ते ४० व्यापाऱ्यांनी आपले स्टॉल लावले असून केशर, रत्नागिरी हापूस, देवगड आदी जातीसह स्थानिक आंब्याचा समावेश आहे,. पहिल्या दिवशी चांगला प्रतिसाद मिळाला. सांगलीकरांनी आंबा खरेदी करण्यासाठी गर्दी केली होती.

दरम्यान हा आंबा महोत्सव आजपासून दि १२ मे पर्यंत सकाळी नऊपासून रात्री आठपर्यंत सुरु राहणार असून सांगलीकरांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सभापती सुजय शिंदे यांनी केले आहे.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# काजू उत्पादकतावाढ, प्रक्रिया व्यवस्था हवी बळकट

## पणनमंत्री जयकुमार रावल यांचे मत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**देशभरात काजूची मागणी मोठ्या प्रमाणावर असून, राज्यात काजूची उत्पादकता वाढविण्यास संधी आहे. त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करून काजू उत्पाकदता वाढवावी आणि उत्पादनानंतर त्यावर होणाऱ्या प्रक्रियांमधील अडचणींवर अभ्यासपूर्ण उपाययोजना कराव्यात, अशा महत्त्वपूर्ण सूचना पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिल्या. राज्यातील काजू उत्पादकता व प्रक्रियाव्यवस्था सक्षम करण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करावेत, असेही ते म्हणाले.**



महाराष्ट्र राज्य काजू मंडळाची बैठक गुरुवारी (दि. ८) येथील राज्य कृषी पणन मंडळाच्या मार्केट यार्डातील मुख्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली झाली, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशनचे कार्यकारी संचालक श्रीधर डुबे पाटील, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, पणन विभागाचे सहसचिव विजय लहाने तसेच काजू मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, काजू उत्पादनवाढीसाठी जगातील चांगल्या काजू वाणांचा अभ्यास करून राज्यात लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे. काजू पीक आल्यानंतर त्यावर प्रक्रिया व साठवणूक करण्यासाठी महिला गट व कंपन्यांचा सहभाग वाढवावा. काजूतील ओलावा कमी करण्याच्या प्रक्रियेसाठी त्यांना गोदाम उपलब्ध करून देण्यासाठी उपाययोजना कराव्यात. त्या माध्यमातून काजू प्रक्रिया करण्यात महिला बचत गटांचा व महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांचा सहभाग वाढेल. त्यांनाही रोजगारनिर्मिती होऊन काजू प्रक्रिया जलद गतीने होण्यास मदत होईल. तसेच काजू उत्पादन, त्यावरील प्रक्रिया, ग्रेडिंग, पॅकिंग, मार्केटिंग आणि मूल्यवर्धन करण्यासाठी जगातील अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करावा. काजू उद्योगांना अद्ययावत करण्यासाठी प्रयत्न करताना व्हिएतनाम, कंबोडिया यांसारख्या देशातील तसेच जगातील प्रगत तंत्रज्ञानाचा अभ्यास करून ते महाराष्ट्रात कसे राबविले जातील, यासाठी काजू मंडळाने नियोजन करावे.

### चंदगड, कुडाळमध्ये काजू प्रक्रिया उद्योगाची व्यवहार्यता तपासा

चंदगड आणि कुडाळमध्ये काजू प्रक्रिया उद्योग उभारण्यासंदर्भात व्यवहार्यता तपासण्यात यावी, अशी महत्त्वपूर्ण सूचना त्यांनी केली. ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदामाच्या उभारणीचेही नियोजन तसेच प्रतिदिन १०० मेट्रिक टन उत्पादनक्षमतेचे प्रक्रिया उद्योग कसे उभारले जातील, यासंदर्भात उपाययोजना कराव्यात. काजू लागवडीपासून ते त्यावर प्रक्रिया करून बाजारपेठ मिळवून देण्यासाठी नियोजनपूर्वक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. तसे केल्यास काजू उत्पादन व शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते, असा विश्वासही पणनमंत्र रावल यांनी व्यक्त केला.

My Pune Edition
May 09, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# 'पणन'ने शेतकरीहिताच्या योजना तयार कराव्यात

पुणे : पुढारी वृत्तसेवा
राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालास चांगला भाव मिळावा, ही शासनाची भूमिका असून, शेतकरीहिताच्या सुविधा पुरविण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळाने योजना तयार कराव्यात, अशा सूचना राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. राज्यातील सध्याची शेतमाल विक्रीव्यवस्थेची सांगड ही जगाच्या कृषी माल विक्रीव्यवस्थेशी घालून स्पर्धा करण्यासाठी जागतिक तंत्रज्ञानाचा वापर करून ही व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नियोजन करावे, असेही त्यांनी सुचविले.

## पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या आढावा बैठकीत सूचना; सक्षम शेतमाल विक्रीव्यवस्थेसाठी जागतिक तंत्रज्ञान वापरा

### काय म्हणाले पणनमंत्री ?

- शेतकऱ्यांच्या सुविधा केंद्रांसाठी त्यांचे अद्ययावतीकरण करा, शेतकऱ्यांच्या मालाला मूल्यवर्धन करण्याची उपाययोजना करावी.
- बाजार समित्या मजबूत, सक्षम व आधुनिक सोयीसुविधायुक्त अद्ययावत करा.
- शेतकऱ्यांना राज्यातील कोणत्याही बाजार समितीतील खरेदी-विक्रीचे दर कुठल्याही बाजार समितीत उपलब्ध होतील अशी यंत्रणा ई-नामच्या माध्यमातून राबवा.
- बाजार समित्यांमधील विकासकामे करताना स्टार्टअपला संधी द्यावी. प्रस्तावातील मागणीच्या खर्चाचा रेशो ठरवून २५ टक्के स्वनिधी खर्च झाल्यानंतरच उर्वरित कर्ज रक्कम मंजूर करावी. उर्वरित ७५ टक्के निधीतील किमान ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणाऱ्या सुविधा निर्माण कामांसाठी वापरावी.
- रस्तेदुरुस्तीसाठी बाजार समित्यांनी स्वनिधी वापरावा. ज्या बाजार समित्यांवर प्रशासक नेमलेले असतील तेथील १०० टक्के वसुली करावी.


'पणन'च्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना पणनमंत्री जयकुमार रावल व उपस्थित अधिकारी.

### 'पणन'च्या बैठकीत खालील कामांना दिली मंजुरी

- बापगाव (जि. ठाणे) येथील पणन मंडळाच्या जागेवर तातडीने संरक्षक भिंत बांधणे.
- राज्यातील शेतमालाची व शेतमाल बाजारभावाची माहिती देणारे स्वतंत्र पोर्टल उपलब्ध करणे.
- तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या निधीत वाढ.
- ई-नाम योजना अंमलबजावणी, उपविभागीय कार्यालये स्थापित करण्याबाबत, वाशी येथील सुविधा केंद्र, संत्रा प्रक्रिया केंद्र उभारणी, काजू फळपीक योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्यात ५ हजार मेट्रिक टन क्षमतेच्या गोदाम उभारण्यासाठी सल्लागार नियुक्तीला मान्यता देणे.
- वाई बाजार समितीच्या पाचवड उपबाजारात सेल हॉल बांधणी प्रस्तावास मंजुरी देणे.

गुरुवारी (दि. ८) मार्केट यार्डातील मुख्यालयात पणनमंत्री रावल यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाची आढावा बैठक पार पडली. त्या वेळी त्यांनी पणन मंडळाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. या बैठकीला सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, संचालक विकास रसाळ, सरव्यवस्थापक विनायक कोकरे आदी उपस्थित होते. तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे प्रतिनिधी म्हणून संचालक मंडळावर नियुक्त करण्यात आलेल्या सभापतींमध्ये नारायण पाटील (सभापती, दोंडाईचा बाजार समिती, जि. धुळे) आणि संजय पाटील-काजळे (सभापती, मलकापूर बाजार समिती, जि. बुलडाणा) हेसुद्धा आज पहिल्याच बैठकीस उपस्थित होते.

Pune Edition
May 09, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

Pudhari, 09/05/2025



सांगली : महोत्सवात आंब्याची माहिती घेताना जिल्हाधिकारी अशोक काकडे. सोबत डॉ. सुभाष घुले, सुजय शिंदे आदी. ( छाया : सचिन सुतार)

# सांगलीत आंबा महोत्सव सुरू

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, कोल्हापूर व सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने येथील वसंतदादा मार्केट यार्डमधील पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील स्मृतीभवन येथे सांगली 'आंबा महोत्सव २०२५' ला प्रारंभ करण्यात आला. यावेळी उद्‌घाटन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्याहस्ते करण्यात आले.

यावेळी अशोक काकडे यांनी विविध शेतकरी उत्पादकांच्या स्टॉलला भेट देऊन विविध आंब्यांच्या जातीविषयी माहिती जाणून घेतली. आंब्यांच्या दुर्मिळ जातीचे संवर्धन झाले पाहिजे. महोत्सवाच्या माध्यमातून उत्तम प्रतीचा आंबा सर्वसामान्य नागरिकांना उत्पादक शेतकरी ते ग्राहक यांच्या माध्यमातून मिळत असल्याबाबत समाधान व्यक्त केले.

मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, समितीचे सभापती सुजय शिंदे, रावसाहेब पाटील, ओंकार माने, अनिल जाधव, आनंदराव नलवडे, संग्राम पाटील, बापूसाहेब बुरसे, सचिव महेश चव्हाण आदी उपस्थित होते. आभार ओंकार माने यांनी मानले.

Lokmat, 09/05/2025

# सांगलीत उद्यापासून आंबा महोत्सव

**सांगली :** सांगलीतील वसंतदादा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गुरुवार (दि.८) ते सोमवार (दि. १२) दरम्यान आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सभापती सुजय शिंदे व सचिव महेश चव्हाण यांनी मंगळवारी दिली.

गुरुवारी जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते आंबा महोत्सवाचे उद्घाटन होणार असून यावेळी जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, कृषी विकास अधिकारी मनोजकुमार वेताळ आदी उपस्थित राहणार असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले.

या आंबा महोत्सवाच्या निमित्ताने शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतमालाची विक्री स्वतः उत्पादक शेतकरी करणार आहेत. उत्पादक शेतकरी ते ग्राहक या संकल्पनेतून सांगलीतील नागरिकांना उत्तम दर्जाचा, अस्सल नैसर्गिकरीत्या पिकविलेले हापूस व केशर आंबे उपलब्ध होणार आहेत. तरी याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सभापती शिंदे यांनी केले आहे.

सांगली जिल्हा

दैनिक ललकार
पान
३
७/५/२०२५



# वसंतदादा मार्केट यार्ड सांगली येथे आंबा महोत्सवाचे आयोजन

। ललकार वृत्त ।

सांगली, दि.६ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे, व सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने सांगली आंबा महोत्सव २०२५ चे आयोजन दिनांक ८ मे ते १२ मे २०२५ अखेर वसंतदादा स्मृतिभवन , वसंत मार्केट यार्ड सांगली. येथे केले आहे. दिनांक ८ मे रोजी सकाळी १० वाजता अशोक काकडेसो जिल्हाधिकारी सांगली, यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

श्री. मंगेश सुरवसे- जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. डॉ. सुभाष घुले – उपसरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, कोल्हापूर श्री. सुजय (नाना) शिंदे – सभापती ,सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती. श्री. विवेक कुंभार – जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सांगली श्री. मनोजकुमार वेताळ- कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली श्री.रावसाहेब पाटील उपसभापती, बाजार समिती सांगली. श्री. ओंकार माने- पणन अधिकारी, पणन मंडळ, सांगली श्री.महेश चव्हाण- सचिव तसेच सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व संचालक मंडळ या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना १७ जानेवारी १९५१ रोजी पद्मभूषण वसंतदादा पाटील यांनी शेतकऱ्याच्या शेतीमालाला योग्य बाजारपेठ मिळावी, त्याच्या शेतीमालाला योग्य बाजार भाव मिळावा, त्याची आर्थिक सामाजिक प्रगती व्हावी या दृष्टिकोनातून स्थापना केली. सांगली बाजार समितीचे संस्थापक पद्मभूषण वसंतदादा पाटील यांच्या कर्तुत्वाने प्रेरणेने व आशीर्वादाने सांगली बाजार समितीच्या ७५ वर्षाच्या यशस्वी वाटचालीनंतर अमृत महोत्सवी वर्ष बाजार समितीस चालू आहे. आणि या अमृत महोत्सवी वर्षात शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवणे असा संकल्प, सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुजय नाना अशोकराव शिंदे उपसभापती रावसाहेब पाटील व सर्व संचालक मंडळांनी केला आहे. तसेच या आंबा महोत्सवाचे निमित्ताने शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतमालाची विक्री स्वतः उत्पादक शेतकरी करणार आहेत. उत्पादक शेतकरी स्टॉलचे माध्यमातून महापालिका स्तरावर शेतकऱ्यांचे आंबा फळे पिकास बाजारपेठ मिळणार आहे . उत्पादक ते ग्राहक यांच्यात या निमित्ताने थेट संवाद होणार आहे. उत्पादक शेतकरी ते ग्राहक या संकल्पनेतून सांगली नगरीतील नागरिकांना उत्तम दर्जाचा, अस्सल नैसर्गिक रित्या पिकविलेला हापूस व केशर आंबे उपलब्ध होणार आहेत. या आंबा महोत्सवाचे आयोजन सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंत दररोज पाच दिवस केले आहे. तरी याचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सुजय नाना शिंदे सभापती बाजार समिती सांगली. यांनी केले आहे.



Lalkar, 09/05/2025

# वसंतदादा मार्केट यार्ड सांगली येथे आंबा महोत्सवाचा उत्साहात शुभारंभ

। ललकार वृत्त ।

सांगली, दि. ८ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे, व सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने वसंत मार्केट यार्ड सांगली येथील वसंतदादा स्मृती भवन येथे सांगली आंबा महोत्सव २०२५* चा शुभारंभ सांगलीचे जिल्हाधिकारी श्री. अशोक काकडे यांचे शुभ हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्रथमता श्री अशोक काकडे साहेब जिल्हाधिकारी यांनी प्रदर्शन हॉलची फित कापून व दिप प्रज्वलन करून आंबा महोत्सवाचा शुभारंभ केला. त्यांनी विविध शेतकरी उत्पादक यांच्या स्टॉलला भेटी दिल्या प्रदर्शनात मांडलेल्या विविध आंब्याच्या जाती विषयी माहिती जाणून घेतली. आंब्याच्या दुर्मिळ



जातीचे संवर्धन झाले पाहिजे तसेच अशा प्रदर्शन, महोत्सवाच्या माध्यमातून उत्तम प्रतीचा आंबा सर्वसामान्य नागरिकांना उत्पादक शेतकरी ते ग्राहक यांच्या माध्यमातून मिळत असले बाबत जिल्हाधिकारी श्री.अशोक काकडे यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. सुभाष घुले - उपसरव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, कोल्हापूर श्री.सुजय (नाना) शिंदे - सभापती ,सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती. श्री विवेक कुंभार - जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सांगली श्री. मनोजकुमार वेताळ- कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली श्री.रावसाहेब पाटील उपसभापती, बाजार समिती सांगली. संचालक श्री.आनंदराव नलवडे, श्री संग्राम दादा पाटील, श्री बापूसो बुरसे, श्री महेश पवार, श्री.बाबासाहेब माळी, श्री.शशिकांत नागे, श्री रमेश पाटील, श्री रामचंद्र पाटील, श्री प्रशांत मजलेकर श्री काडापा वारद, श्री.मारुती बंडगर, श्री.ओंकार माने- पणन अधिकारी, श्री महेश चव्हाण- सचिव तसेच शेतकरी उत्पादक, कामगार ,हमाल , सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व अधिकारी कर्मचारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार महेश चव्हाण सचिव यांनी मानले.सदरचे प्रदर्शन दिनांक ८ मे ते १२ मे २०२५ सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंत चालू असणार आहे.

Kesari, 09/05/2025

# महोत्सवामुळे उत्तम आंबा शेतकऱ्यांकडून थेट ग्राहकांपर्यंत

## जिल्हाधिकारी अशोक काकडे : वसंतदादा मार्केट यार्डमध्ये आंबा महोत्सवास सुरुवात

केसरी वृत्तसेवा

**सांगली** : प्रदर्शन, महोत्सवाच्या माध्यमातून उत्तम प्रतीचा आंबा सर्वसामान्य नागरिकांना थेट उत्पादक शेतकऱ्यांच्या माध्यमातून मिळत आहे, असे मत जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे व सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वसंतदादा स्मृती भवन, वसंत मार्केट यार्ड सांगली येथे आयोजित आंबा महोत्सवच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

गेल्या काही वर्षांपासून भरविण्यात येणारा आंबा महोत्सव याही वर्षी भरविण्यात आला आहे. या सांगली आंबा महोत्सव २०२५ चा प्रारंभ जिल्हाधिकारी काकडे यांच्या हस्ते झाला. जिल्हाधिकाऱ्यांनी विविध उत्पादक शेतकरी यांच्या स्टॉलला भेटी दिल्या. प्रदर्शनात मांडलेल्या आंब्यांच्या जातींविषयी त्यांनी माहिती जाणून घेतली.



आंबा महोत्सवाच्या उद्घाटनानंतर आंबा उत्पादक शेतकऱ्यांची चर्चा करताना जिल्हाधिकारी अशोक काकडे व इतर मान्यवर.

यावेळी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, कोल्हापूरचे सरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुजय शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी विवेक कुंभार, कृषी विकास अधिकारी मनोजकुमार वेताळ, बाजार समितीचे उपसभापती रावसाहेब पाटील, बाजार समिती संचालक संग्राम पाटील, आनंदराव नलवडे, बापूसो बुरसे, महेश पवार, बाबासाहेब माळी, शशिकांत नागे, रमेश पाटील, रामचंद्र पाटील, प्रशांत मजलेकर, काडाप्पा वारद, मारुती बंडगर, ओंकार माने, महेश चव्हाण तसेच शेतकरी उत्पादक, कामगार, हमाल, सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते. आभार बाजार समितीचे सचिव महेश चव्हाण यांनी मानले.

हा आंबा महोत्सव दि. ८ ते १२ मेपर्यंत दररोज सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू असणार आहे.

दैनिक बंधुता

Bandhuta, 09/05/2025



# सांगलीत आंबा महोत्सवाचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

**बंधुता न्यूज नेटवर्क**

सांगली : महाराष्ट्र राज्य कृपी पणन मंडळ पुणे, व सांगली कृपी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने सांगली आंबा महोत्सव २०२५ चे आयोजन दिनांक ८ मे ते १२ मे २०२५ अखेर वसंत मार्केट यार्ड येथे केले आहे. या आंबा महोत्सवाचे उदघाटन सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते आज करण्यात आले. आंब्याच्या बरोबर शेतकऱ्यांनी ज्या त्या आंब्याची कलमे सुद्धा विकावीत जेणेकरून त्यांना अधिक उत्पन्न मिळू शकेल असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी यावेळी केले.

आंबा महोत्सवाच्या निमित्ताने शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतमालाची विक्री स्वतः उत्पादक शेतकरी करणार आहेत. उत्पादक शेतकरी स्टॉलच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आंबा फळे पिकास बाजारपेठ मिळणार आहे. उत्पादक ते ग्राहक यांच्यात या निमित्ताने थेट संवाद होणार आहे. उत्पादक शेतकरी ते ग्राहक या



संकल्पनेतून सांगली नगरीतील नागरिकांना उत्तम दर्जाचे, अस्सल नैसर्गिक रित्या पिकविलेले हापूस व केशर आंबे उपलब्ध होणार आहेत. या आंबा महोत्सवा मध्ये ३२ प्रकारचे आंबे उपलब्ध आहेत. या आंबा महोत्सवाचे आयोजन ८ मे ते १२ मे या पाच दिवसाच्या कालावधीत दररोज सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंत केले आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य कृपि पणन मंडळ, कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाप घुले यांनी केले आहे.

शेतकऱ्यांनी पिकवलेल्या आंब्यांना बाजारपेठ मिळवण्याच्या उद्देशाने राज्यभरात आंबा महोत्सवाच आयोजन केले जात आहे. पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर आणि त्यानंतर आता सांगलीमध्ये करण्यात आला आहे.

देशोन्नती

Deshonnati, 09/05/2025

# आंबा-मिलेट महोत्सवातून ग्राहक व उत्पादकांना लाभ होणार

## ■ जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांचे प्रतिपादन ■ कृषी पणन मंडळाचा उपक्रम

**देशोन्नती वृत्तसंकलन**

**अमरावती :** कृषी पणन मंडळातर्फे आंबा व मिलेटस् हा चांगला महोत्सव राबविण्यात येत आहे. यामुळे उत्पादकांना ग्राहक मिळण्यासोबतच ग्राहकांनाही उत्कृष्ट उत्पादन मिळणार आहे. १२ मे पर्यंत जाधव पॅलेस बडनेरा रोड येथे महोत्सव सुरू आहे. नागरिकांनी या महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

महोत्सवाचे उद्घाटन प्रथम येणाऱ्या ग्राहकाच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार उपस्थित होते. यावेळी सहकारी संस्था सहनिबंधक चैतन्य नसाणे, जिल्हा उपनिबंधक कुंभार उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कटियार म्हणाले, कृषी पणन मंडळाचा उपक्रम स्तुत्य असून यामध्ये मध्यस्थांची संख्या कमी होऊन शेतकरी आणि प्रक्रियादार हे ग्राहकांच्या जवळ येतील. यामुळे ग्राहकांना आवश्यक असणाऱ्या उत्पादनाची जाणीव शेतकऱ्यांना होईल. आंबा महोत्सवामुळे हापूस, केशर आणि गावरान आंब्याला चांगली बाजारपेठ उपलब्ध होण्यासोबतच ग्राहकांनाही चांगल्या दर्जाचा आंबा उपलब्ध झाला आहे. मिलेटस् आणि त्यापासून बनवलेल्या पदार्थांना बाजारपेठ उपलब्ध होतील. महोत्सवातून ग्राहक आणि शेतकऱ्यांना लाभ होणार असल्याने महोत्सवाला सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

> शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपनी प्रक्रियादार यांना मिलेट आणि हापूस, केशर, गावरान आंबा या फळांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य कृषी पणन मंडळातर्फे आंबा मिलेटस् महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. १२ मेपर्यंत हा महोत्सव जाधव पॅलेस येथे सुरू राहणार आहे. यात ४५ उत्पादक आणि कंपन्यांनी सहभाग घेतला आहे. या महोत्सवात आंब्याच्या विविध प्रकारांसह ज्वारी, बाजरी, नाचणी आदी कडधान्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहे.






शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपनी प्रक्रियादार यांना मिलेट आणि हापूस, केशर, गावरान आंबा या फळांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य कृषी पणन मंडळातर्फे आंबा मिलेटस् महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. १२ मेपर्यंत हा महोत्सव जाधव पॅलेस येथे सुरू राहणार आहे. यात ४५ उत्पादक आणि कंपन्यांनी सहभाग घेतला आहे.

पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक दिनेश डागा यांनी वीस वर्षापासून विविध महोत्सव आयोजित करून शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येत आहे.

तसेच केंद्र शासनाच्या मिलेट धोरणानुसार ज्वारी, बाजरी, भगर, नाचणी आदी मिलेटस्ला बाजारपेठ उपलब्ध व्हाव्यात, यासाठी महोत्सव घेण्यात येते. महोत्सवाला नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

Amravati Edition
May 09, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

Amravati, 09/05/2025

# आंबा-मिलेट महोत्सवातून ग्राहक, उत्पादकांना लाभ होणार : जिल्हाधिकारी



अमरावती, दि. ८ : कृषी पणन मंडळातर्फे आंबा व मिलेटस् हा चांगला महोत्सव राबविण्यात येत आहे. यामुळे उत्पादकांना ग्राहक मिळण्यासोबतच ग्राहकांनाही उत्कृष्ट उत्पादन मिळणार आहे. त्यामुळे नागरिकांनी या महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

महोत्सवाचे उद्घाटन प्रथम येणाऱ्या ग्राहकाच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार उपस्थित होते. यावेळी सहकारी संस्था सहनिबंधक चैतन्य नसाणे, जिल्हा उपनिबंधक श्री. कुंभार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले, कृषी पणन मंडळाचा उपक्रम स्तुत्य असून यामध्ये मध्यस्तांची संख्या कमी होऊन शेतकरी आणि प्रक्रियादार हे ग्राहकांच्या जवळ येतील. यामुळे ग्राहकांना आवश्यक असणाऱ्या उत्पादनाची जाणीव शेतकऱ्यांना होईल. आंबा महोत्सवामुळे हापूस, केशर आणि गावरान आंब्याला चांगली बाजारपेठ उपलब्ध होण्यासोबतच ग्राहकांनाही चांगल्या दर्जाचा आंबा उपलब्ध झाला आहे. मिलेटस आणि त्यापासून बनवलेल्या पदार्थांना बाजारपेठ उपलब्ध होतील. महोत्सवातून ग्राहक आणि शेतकऱ्यांना लाभ होणार असल्याने महोत्सवाला सहपरिवार उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

शेतकरी आणि शेतकरी उत्पादक कंपनी प्रक्रियादार यांना मिलेट आणि हापूस, केशर, गावरान आंबा या फळांना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य कृषी पणन मंडळातर्फे आंबा मिलेटस महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. दि. १२ मेपर्यंत हा महोत्सव जाधव पॅलेस येथे सुरू राहणार आहे. यात ४५ उत्पादक आणि कंपन्यांनी सहभाग घेतला आहे.

पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक दिनेश डागा यांनी वीस वर्षापासून विविध महोत्सव आयोजित करून शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाच्या मिलेट धोरणानुसार ज्वारी, बाजरी, भगर, नाचणी आदी मिलेटसला बाजारपेठ उपलब्ध व्हाव्यात यासाठी महोत्सव घेण्यात येते. महोत्सवाला नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

Punyanagari, 09/05/2025



पुण्यनगरी SMART सांगली

# सांगलीत वसंतदादा मार्केट यार्डमध्ये आंबा महोत्सव


## पाच दिवस आयोजन : सांगलीकरांना मिळणार अस्सल हापूस, केशर आंबा



**सांगली / प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे व सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सांगली आंबा महोत्सव २०२५ चे आयोजन दि. ८ ते १२ मे अखेर वसंतदादा स्मृतिभवन, वसंत मार्केट यार्ड सांगली येथे केले आहे. दि ८ मे रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले यांनी दिली.

याप्रसंगी जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुजय शिंदे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार, कृषी विकास अधिकारी मनोजकुमार वेताळ, उपसभापती रावसाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती आहे. कार्यक्रमास पणन अधिकारी ओंकार माने, बाजार समितीचे सचिव महेश चव्हाण, सर्व संचालक उपस्थित राहणार आहेत.



सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना १७ जानेवारी १९५१ रोजी पद्मभूषण वसंतदादा पाटील यांनी शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य बाजारपेठ मिळावी, त्याच्या शेतीमालाला योग्य बाजारभाव मिळावा, त्याची आर्थिक, सामाजिक प्रगती व्हावी या दृष्टिकोनातून स्थापना केली. बाजार समितीच्या ७५ वर्षाच्या यशस्वी वाटचालीनंतर अमृत महोत्सवी वर्ष बाजार समितीस चालू आहे. या अमृत महोत्सवी वर्षात शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबवणे असा संकल्प सभापती सुजय शिंदे, उपसभापती रावसाहेब पाटील व संचालकांनी केला आहे.

आंबा महोत्सवाचे निमित्ताने शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतमालाची विक्री स्वतः उत्पादक शेतकरी करणार आहेत. उत्पादक शेतकरी स्टॉलच्या माध्यमातून महापालिका स्तरावर आंबा फळ पिकास बाजारपेठ मिळणार आहे. उत्पादक ते ग्राहक यांच्यात थेट संवाद होणार आहे.

नागरिकांना उत्तम दर्जाचा, अस्सल नैसर्गिक रित्या पिकविलेला हापूस व केशर आंबे उपलब्ध होणार आहेत. आंबा महोत्सवाचे आयोजन सकाळी ९ ते रात्री ८ पर्यंत दररोज पाच दिवस केले आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सभापती सुजय शिंदे यांनी केले आहे.

Pudhari, 07/05/2025




# सांगलीत उद्यापासून 'आंबा महोत्सव'

सांगली : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्यातर्फे सांगली आंबा महोत्सव २०२५ चे आयोजन गुरुवार, दि. ८ ते १२ मेअखेर वसंतदादा मार्केट यार्डमधील वसंतदादा स्मृतिभवन येथे करण्यात आले आहे. गुरुवारी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती बाजार समितीचे सभापती सुजय शिंदे यांनी दिली.

शिंदे म्हणाले, कार्यक्रमास कृषि पणन मंडळ, कोल्हापूरचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार, कृषी विकास अधिकारी मनोजकुमार वेताळ, बाजार समितीचे उपसभापती रावसाहेब पाटील, पणन अधिकारी ओंकार माने, बाजार समितीचे सचिव महेश चव्हाण यांच्यासह सर्व संचालक उपस्थित राहणार आहेत.



या आंबा महोत्सवानिमित्ताने शेतीमालाची विक्री स्वतः उत्पादक शेतकरी करणार आहेत. उत्पादक शेतकरी स्टॉलच्या माध्यमातून महापालिकास्तरावर शेतकऱ्यांच्या आंबा फळास बाजारपेठ मिळणार आहे.

उत्पादक ते ग्राहक यांच्यात यानिमित्ताने थेट संवाद होणार आहे. उत्पादक शेतकरी ते ग्राहक या संकल्पनेतून सांगली नगरीतील नागरिकांना उत्तम दर्जाचा, अस्सल नैसर्गिकरित्या पिकविलेले हापूस व केशर आंबे उपलब्ध होणार आहेत. या आंबा महोत्सवाचे आयोजन सकाळी ९ ते रात्री ८ वाजेपर्यंत दररोज पाच दिवस केले आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शिंदे यांनी केले आहे.

Lokmat, 07/05/2025

# बाजार समितीतर्फे आंबा महोत्सव

सांगली : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व सांगली कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने ८ ते १२ मे या कालावधीत आंबा महोत्सव आयोजित केला आहे. या महोत्सवाचे ८ मे रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. महोत्सव सांगली मार्केट यार्डात आयोजित केला आहे. उद्घाटनास जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. सुभाष घुले, सांगली बाजार समितीचे सभापती सुजय शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार उपस्थित राहणार आहेत

दिव्य मराठी
चाळीसगाव 03-05-2025

# शेतमाल तारण कर्ज योजनेंतर्गत धनादेश वाटप

## चाळीसगाव कृउबासमध्ये शेतमाल तारण कर्ज योजनेची प्रभावी अंमलबजावणी; शेतकऱ्यांमध्ये समाधान

शहर प्रतिनिधी | चाळीसगाव

अवकाळी पाऊस व प्रतिकुल परिस्थितीमुळे शेतकरी पुर्ण उद्वस्त झाला आहे. यामध्ये भर म्हणजे शेतीमालाला योग्य भाव नसेल तर शेतकरी फार मेटाकुटीला येतो. यासाठी पर्यायी उपाययोजना म्हणून बाजार समितीमध्ये शेतमाल तारण कर्ज योजना सुरु करण्याचा निर्णय बाजार समितीचे सभापती मच्छिंद्र राठोड , उपसभापती वनिता पाटील व संचालक मंडळाने घेतला होता.त्यानुसार निवृत्ती गायके,रविंद्र अमृतकर,प्रमिला अमृतकर व अजिंक्य अमृतकर यांना शेतमाल तारण कर्ज योजनेचे धनादेश देण्यात आले. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच वरील शेतकरी बांधवांना शेतमाल तारण कर्ज योजनेअंतर्गत एकूण रक्कम १ लाख ६३ हजार पाचशे रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे सभापती मच्छिंद्र जगन्नाथ राठोड, संचालक रवींद्र पाटील, माजी उपसभापती साहेबराव राठोड, संचालक रवींद्र पाटील, शैलेंद्रसिंग पाटील, सचिव जगदिश लोधे, सहसचिव सतीश पाटील,लेखापाल ज्ञानेश्वर गायके,पर्यवेक्षक प्रवीण वाघ तसेच बाजार समितीचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


धनादेश वितरणप्रसंगी उपस्थित बाजार समितीचे संचालक मंडळ तसेच अधिकारी व कर्मचारी.

### शेतीमाल सुरक्षित ठेवण्याकरिता शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ अवश्य घ्यावा

या योजनेअंतर्गत कर्जासाठी मुग, उडिद, करडई,ज्वारी,बाजरी, मका, सोयाबीन, सुर्यफूल गहू, राजमा, बेदाणा, हळद, काजू, बी या शेतीमालाच्या एकूण किंमतीवर ७५ टक्के पर्यंतचे कर्ज वार्षिक ६ टक्के दराने योजनेस प्रारंभ केल्यानंतर सहा महिन्यांच्या मुदतीकरीता अदा केले जाते. त्यामुळे आपला शेतीमाल सुरक्षित ठेवण्याकरीता तसेच वाढत्या बाजारभावाचा फायदा घेण्याकरिता शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा. असे आवाहन बाजार समितीचे सभापती मच्छिंद्र राठोड, उपसभापती वनिता पाटील, सचिव जगदिश लोधे व संचालक मंडळाने केले आहे.

देशदूत
शिल्पकार विकासाचा...
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
03 May 2025 - Page 5-A

## चाळीसगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये

# शेतमाल तारण कर्ज योजनेची प्रभावी अंमलबजावणी



▸▸ चाळीसगाव । प्रतिनिधी

अवकाळी पाऊस व प्रतिकुल परिस्थितीमुळे शेतकरी पुर्ण उध्द्वस्त झाला आहे.यामध्ये भर म्हणजे शेतीमालाला योग्य भाव नसेल तर शेतकरी फार मेटाकुटीला येतो. यासाठी पर्यायी उपाययोजना म्हणून बाजार समितीमध्ये शेतमाल तारण कर्ज योजना सुरू करण्याचा निर्णय बाजार समितीच्या संचालक मंडळाने घेतला होता.त्यानुसार निवृत्त सुकदेव गायके,रविंद्र वालचंद अमृतकर,सौ.प्रमिला रविंद्र अमृतकर व अजिंक्य रविंद्र अमृतकर यांना शेतमाल तारण कर्ज योजनेचे धनादेश नुकतेच देण्यात आले.

सन २०२५/२६ या आर्थिक वर्षाचया सुरूवातीलाच वरील शेतकरी बांधवांना शेतमाल तारण कर्ज योजनेअंतर्गत एकूण १६३५०० रुपयांचे धनादेश वितरित करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे सभापती मच्छिंद्र जगन्नाथ राठोड,माजी

## शेतकऱ्यांना १ लाख ६३ हजार ५०० रुपयांचे धनादेश वितरित

सभापती व विद्यमान संचालक .रविंद्र पाटील,माजी उपसभापती साहेबराव राठोड,संचालक रविंद्र शिवराम पाटील, शैलेंद्रसिंग पाटील, प्रदिप पाटील, नवलभाऊ पवार, सुनिल पाटील जमादार हेमराज पाटील,साहेबराव राठोड ,सचिव जगदिश रघुनाथ लोधे, सहसचिव सतिश पाटील,लेखापाल ज्ञानेश्वर गायके,पर्यवेक्षक प्रवीण वाघ, व्यापारी रमेश सोनगिरे टेकवाडे येथील सरपंच वाल्मीक पाटील शेतकरी श्री.रविंद्र अमृतकर, अजिंक्य अमृतकर तसेच बाजार समितीचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

आपला शेतीमाल सुरक्षित ठेवण्याकरीता तसेच वाढत्या बाजारभावाचा फायदा घेण्याकरिता शेतमाल तारण कर्ज योजनेचा लाभ घ्यावा, अस आवाहन यावेळी बाजार समितीचे सभापती मच्छिंद्र जगन्नाथ राठोड, उपसभापती वनिताबाई विश्वास पाटील, सचिव जगदिश लोधे व सर्व संचालक मंडळ यांनी केले आहे.

### काय आहे शेतमाल तारण योजना

यामध्ये शेतमालावर १८० दिवसांसाठी मालाच्या एकूण किंमतीवर ७५ टक्के पर्यंतचे कर्ज वार्षिक ६ टक्के दराने दिले जाते. या योजनेअंतर्गत कर्जासाठी मुग, उडिद , करडई ज्वारी बाजरी मका सोयाबीन,सुर्यफुल चना भात (धान) गहू वाघ्या घेवडा (राजमा) बेदाणा हळद काजू बी सुपारी या शेतीमालाच्या एकूण किंमतीवर ७५ टक्के पर्यंतचे कर्ज वार्षिक ६ टक्के दराने योजनेस प्रारंभ केल्यानंतर सहा महिन्यांच्या मुदतीकरीता अदा केले जाते.